वाचाः-

१. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७,परिशिष्ट चार

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम १९६१

३. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्रं.३६६/१६-ब, मादाम कामा मार्ग मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ०७.०५.२०२१

४.जिल्हा परिषद नांदेड, पदोन्नती समिती बैठक :- दिनांक :-०७.०६.२०२१

जा.क्र./जिपनां/शिअ प्रा/प्रा-१३/२६०९ [redacted] /२०२१
कार्यालय, शिक्षण विभाग प्रा.
जिल्हा परिषद, नांदेड.
दिनांक :- 18-06-2021

आदेश/-

ज्या अर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील विहीत तरतुदीनुसार जिल्हा परिषद कर्मचा-यांना नियुक्तीचे अधिकार प्रदान केलेल आहेत. त्यानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश ) नियम १९६७ परिशिष्ट चार भाग – २ अनु. क्रं.१ मधील तरतुदीनुसार व संदर्भ क्रं. ४ नुसार पदोन्नती समिती,जिल्हा परिषद नांदेड ने माध्यमिक शिक्षक/ विस्तार अधिकारी शिक्षण या संवर्गातील एकत्रित सेवाजेष्ठतेव्दारे अर्हता योग्य पात्र माध्यमिक शिक्षकांना/शिक्षण विस्तार अधिका-यांना "अराजपत्रित मुख्याध्यापक " या पदावर पदोन्नती देण्याची शिफारस केली आहे.

त्या अर्थी वरील नियमानुसार मला प्राप्त अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड संदर्भ क्रं. ४ मध्ये पदोन्नती समिती, जिल्हा परिषद नांदेड, ने शिफारस केल्यानुसार माध्यमिक शिक्षक / विस्तार अधिकारी शिक्षण या संवर्गाच्या एकत्रीत सेवाजेष्ठतेव्दारे पात्र माध्यमिक शिक्षकांना / शिक्षण विस्तार अधिका-यांना "अराजपत्रित मुख्याध्यापक" या पदावर वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० पे बॅन्ड एस १७ मध्ये पदोन्नती देवून त्यांच्या नावासमोर परिशिष्टात दर्शविलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात रिक्त पदावर पदस्थापना करीत आहे.

**परिशिष्ट अ**

| अ क्रं | माध्यमिक शिक्षक / शिक्षण विस्तार अधिकारी यांचे पुर्ण नाव | कार्यरत जि.प.हा / पंचायत समिती | नियुक्ती दिनांक | जात प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण जि.प.हा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री पाटील सुनिल किशनराव | शिविअ, पं.स. हदगाव | १५.१२.१९८८ | खुला | पाळज/भोकर,रिक्तपदी |
| २ | श्री.देशपांडे श्रीकांत शेषराव | जिपहा लोहगाव/बिलोली | ०५.०३.१९९२ | खुला | चौफाळा/नांदेड,रिक्तपदी |
| ३ | श्री.एस. आर.आळंदे | शिक्षण विभाग प्रा.जि.प.नांदेड | ०६.०७.१९९४ | खुला | येताळा/धर्माबाद,रिक्तपदी |
| ४ | श्री आर एम बसवदे | शिक्षण विभाग प्रा.जि.प.नांदेड | १५.०५.१९९५ | खुला | शिवणी/किनवट,रिक्तपदी |
| ५ | श्री.गुट्टे बी.पी. | शिविअ,पं.स.लोहा | १५.१०.१९९६ | भज ड | जारीकोट/धर्माबाद,रिक्तपदी |
| ६ | श्री गोविंद चंदर चव्हाण | माशि, जि.प.हा कन्या मुखेड | १६.१०.१९९६ | विजा अ | सावरगाव पि/मुखेड,रिक्तपदी |
| ७ | श्री पाटील बी एम | शिविअ , पं. स मुखेड | २१.१२.१९९६ | भज क | मातुळ/भोकर,रिक्तपदी |
| ८ | श्री राजपूत एस बी | माशि जिपहा कुंटुर/नायगाव | २३.१२.१९९६ | विजा अ | कन्या नायगाव,नायगाव रिक्तपदी |
| ९ | श्री पवार काळू धर्मा | जिपहा बाचोटी/कंधार | ३१.१२.१९९६ | अनु जमाती | किनी/भोकर,रिक्तपदी |
| १० | श्री थोटवे बालाजी सटवाजी | माशि, जिपहा येळेगाव/ अर्धापूर | ०५.०४.१९९७ | अनु जाती | रोहिपिंपळगाव/मुदखेड, रिक्तपदी |

**अटी व शर्ती**

१.या पदोन्नतीच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमत केलेले आदेश बंधनकारक राहतील.

२.या पदोन्नतीत पात्र जेष्ठतम माध्यमिक शिक्षक / शिक्षण विस्तार अधिकारी वगळल्याचे निदर्शनास आल्यास सिध्द झाल्यास कनिष्ठतम पदोन्नती धारकास देण्यात आलेली पदोन्नती रद्द करुन पात्र जेष्ठतम शिक्षकास पदोन्नती देण्यात येईल.

Scanned with CamScanner

३.संबंधितास पदोन्नती दिलेल्या ठिकाणी (७) दिवसाच्या आत रुजू व्हावे लागेल तदनंतर सदर आदेश आपोआप रद्द होतील.सदर पदास जर नकार द्यावयाचा असेल तर तसे लेखी स्वरुपात या कार्यालयास कळवावे लागेल.

४.सदर पदोन्नतीस नकार दिल्यास भविष्यात त्यांना शासन निर्णय दिनांक १२.०९.२०१६ नुसार पदोन्नती देण्याबाबत पुढील ३ वर्ष विचार केला जाणार नाही या बाबतची नोंद संबंधिताच्या मूळ सेवापुस्तिकेत घेण्यात यावी.

५.शासन पत्र दिनांक १.२.२००८ नुसार अराजपत्रित मुख्याध्यापक पदोन्नती धारकास शालेय व्यवस्थापन पदविका (५) वर्षाच्या आत पुर्ण करणे बंधनकारक राहील.

६. सदरची पदोन्नती ही निव्वळ तातपुरत्या स्वरूपाची असून विशेष अनुमती याचिका क्रं २८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहुन पदोन्नतीच्या कोटयातील भरलेली रिक्त पदे मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन भरण्यात येत असल्यामुळे पदोन्नती बाबत मा.न्यायालयाचा निर्णय अंतीम राहील.

७. जिल्हा परिषद सेवेत नियुक्ती दिनांकानुसार पदोन्नती करण्यात आली असून ती कार्यमूक्त करण्यापुर्वी बरोबर असल्याची खात्री करूनच कार्यमूक्त करावे.

८. वरील प्रमाणे नोंदवल्यानुसार नियुक्ती दिनांक चुकीचा असल्याचे निदर्शनास संबंधितास कार्यमुक्त न करता या कार्यालयास तसे तात्काळ लेखी स्वरुपात कळवावे.

९. ज्या शिक्षण विस्तार अधिका-यांना यापुर्वी आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. अशा अधिका-यांनी सदरील पदोन्नती नाकारल्यास शासन निर्णय, वित विभाग, दिनांक-३१.१२.२००५ अन्वये देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल.

संबंधितास कार्यमुक्त व रुजू करुन घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद नांदेड. करीता

प्रतिलिपी,

१.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद नांदेड.

२.संबंधित गटविकास अधिकारी पंचायत समिती, जिल्हा नांदेड यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

३.संबंधित गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जिल्हा नांदेड. यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव

४.मुख्याध्यापक संबंधित . यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव

५.संबंधितास (कार्यालय प्रमुखांमार्फत )

स्वाक्षरीत/-
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद नांदेड.

मूळप्रत मा.मुकाअ यांचे स्वाक्षरीत

Scanned with CamScanner